**पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण**
आडगाव, नाशिक-पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०
**E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

**प्रेसनोट** दिनांक:- ०२/०४/२०१८

# सटाणा, देवळा तसेच येवला परिसरात ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाचे अवैध दारू-धंद्यांवर छापे

---

नाशिक जिल्हयातील अवैध धंदयांचे समुल उच्चाटन करण्यासाठी ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाची धडक मोहिम सुरू असुन छुप्यारित्या मद्याची अवैध वाहतुक व विक्री करणारे, तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे इसमांवर सत्वर कारवाई करणेबाबत जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी आदेश दिलेले आहे. त्याप्रमाणे ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सटाणा, देवळा तसेच येवला परिसरातील अवैधरित्या मद्याची विक्री करणारे इसमांवर छापे टाकुन कारवाई केली आहे.

दिनांक ३०/०३/२०१८ रोजी मा.पोलीस अधीक्षक सो यांनी आदेशीत केलेप्रमाणे अवैध धंदयांवर कारवाई करण्यासाठी नेमण्यात आलेल्या विशेष पथकातील अधिकारी व कर्मचारी हे येवला परिसरात गस्त घालत असतांना मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे पथकाने येवला-विंचुर रोडवरील **नंदन टायर्स** या दुकानात अचानक छापा टाकला, सदर ठिकाणी इसम नामे **१) पुरूषोत्तम केशव भवर, वय ४०, रा. अंदरसुल, ता.येवला** हा विनापरवाना बेकायदा देशी - विदेशी मद्याची विक्री करतांना मिळुन आला. सदर दुकानाची घेतली असता, **एकुण १०,२३९/- रू. चा देशी विदेशी मद्याचा अवैध साठा जप्त** करण्यात आलेला आहे. वरील छाप्यामध्ये ताब्यात घेतलेला इसमाविरूध्द येवला शहर पोलीस ठाणेस मुंबई दारूबंदी कायाद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच सायंकाळचे सुमारास विशेष पथकाने येवला ते वैजापुर रोडवरील हॉटेल रानवारा येथे छापा टाकुन सदर ठिकाणावर अवैधरित्या मद्याची विक्री करणारा **इसम नामे २) विवेक बाळासाहेब धनगे, वय १९, रा. अंदरसुल** यास ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन देशी विदेशी मद्याचा किं.रू. ११,५४४/- चा अवैध मद्यसाठा जप्त केला आहे. सदर इसमाविरूध्द येवला तालुका पोलीस ठाणेस मुंबई दारूबंदी कायदयान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच दिनांक ०१/०४/२०१८ रोजी विशेष पथकाने सटाणा व देवळा परिसरातील अवैधरित्या मद्यविक्री करणारे इसमांवर छापे टाकुन कारवाई केली आहे. सदर छाप्यात लखमापुर गावाचे शिवारात हॉटेल मयुरचे परिसरात इसम नामे **३) राजेंद्र केवळ बच्छाव, वय ३९, रा. लखमापुर, ता.सटाणा** हा अवैधरित्या मद्याची विक्री करतांना मिळुन सदर इसमाचे कब्जातुन सुमारे ७५३०/- रू. चा अवैध मद्यसाठा हस्तगत करण्यात आला. तसेच सटाणा-मालेगाव रोडवरील हॉटेल शिवनेरी पॅलेस येथेही छापा टाकुन सदर ठिकाणावरून सुमारे १२,१८०/- रू. किं. चा देशी-विदेशी मद्यसाठा जप्त केला असुन इसम नामे **४) शिवा दयाराम काळे, वय ३५, रा. यशवंत नगर सटाणा** याचेविरूध्द दारूबंदी कायदयान्वये कारवाई केली आहे. तसेच देवळा परिसरातील देवळा ते मालेगाव रोडवरील हॉटेल केतन येथे देशी-विदेशी मद्याची अवैधरित्या विक्री करणारा इसम **नामे ५) आकाश भगवान बच्छाव, वय २४, रा. विजोर, ता.सटाणा** यास ताब्यात घेवुन सदर हॉटेलची झडती घेतली असता, सुमारे २०,०१८/- रू. किं.चा अवैध मद्यसाठा जप्त करण्यात आलेला आहे. जिल्हयातील अवैध दारूधंदयांचा नायनाट होणेसाठी ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाने येवला, देवळा व सटाणा परिसरात छापे टाकुन **दारूबंदी कायदयान्वये एकुण ०५ गुन्हे दाखल** करून **सुमारे ६१,५११ रू. चा अवैध मद्यसाठा जप्त** केलेला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकातील पोउनि श्री. सुरेश चौधरी व पथकातील कर्मचारी यांनी अवैध धंदयांवर कारवाई केली आहे. जिल्हयातील अवैध धंदयांचे समुल उच्चाटन होणेसाठी आगामी काळात सतत कारवाई सुरू राहणार आहे.